# प्रेसनोट

दि.१९/०३/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.४२१/२०२० |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | हरिश्चंद्र जबाजी बेंद्रे, वय ३९ वर्ष, दंत सहायक (कंत्राटी तत्वावर), जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १७,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे मुलाचे सन २००७ मध्ये अपंगत्वाचे प्रमाणपत्र काढलेले आहे. परंतू शासनाचे नविन धोरणानुसार अपंगत्वाचे प्रमाणपत्र हे संगणकीकृत करुन ऑनलाईन प्रमाणपत्र काढणे आवश्यक असल्याने तक्रारदार यांनी दि.४/३/२०२० रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर येथे अर्ज केला असता, सदर प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी यातील आरोपी बेंद्रे यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/– रुपये लाचेची मागणी केली. दि.५/३/२०२० रोजी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिलेल्या तक्रारीवरुन जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर येथे लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी बेंद्रे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष २०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती १७,०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची संमती दर्शविली म्हणून दि.१९/३/२०२० रोजी आरोपी बेंद्रे यांचेविरुध्द तोफखाना पो.स्टे., जि. अहमदनगर गुरनं.४२१/२०२० ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

19.03

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर

Scanned by CamScanner